132

मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदे -
उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदलाबदलीने पदे भरणे,
पदे आरक्षणातून मुक्त करणे.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-१०९४/सीआर-५०/९४/१६-ब,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२, दिनांक ५ डिसें. १९९४.

पहा :-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९१/२५५१/[क]/१६-ब, दिनांक २७ मार्च, १९९१.

प्रस्तावना :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०७४/III ब, दिनांक ९.४.१९७५ अन्वये मागासवर्गीयांच्या विविध प्रवर्गांकरिता सरळ सेवा प्रवेशाकरिता आरक्षण विहित करण्यात आले होते. त्यामध्ये इतर मागासवर्गीयांकरिता १० टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले होते, व ते २२ मार्च, १९९४ पर्यंत अंमलात होते. दिनांक ९.४.१९७५ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार इतर मागासवर्गीयांकरिता असलेले आरक्षण भरले न गेल्यास अनुशेष म्हणून दाखविण्याची तसेच ते पुढे ओढण्याची तरतूद नव्हती. त्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०९१/२५५१/[क]/१६-ब, दिनांक २७ मार्च, १९९१ च्या आदेशानुसार अदलाबदलीची पदे भरतांना ती फक्त अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गामधून भरण्याची तरतूद आदेशात करण्यात आलेली होती. मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च, १९९४ अन्वये मागासवर्गीयांच्या ज्या विविध प्रवर्गांकरिता आरक्षण विहित करण्यात आलेले आहे त्यामध्ये इतर मागासवर्गीयांकरिता एकूण १९ टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. या आरक्षित पदांपैकी काही पदे भरली न गेल्यास ती पुढील ५ भरती वर्षांपर्यंत अनुशेष म्हणून पुढे ओढण्याची तरतूद करण्यात आलेली असून ती अदलाबदलीने भरण्याबाबत देखील दिनांक २३ मार्च, १९९४ च्या शासन निर्णयात तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गुणवत्तेनुसार जे मागासवर्गीय उमेदवार सेवा प्रवेशाकरिता पात्र ठरतील त्यांची गणना आरक्षित पदावर केली जाणार नाही अशीही तरतूद दिनांक २३ मार्च, १९९४ च्या आदेशात करण्यात आलेली आहे.

मागासवर्गीयांसाठी असलेल्या सरळ सेवा भरती तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षित पदे उमेदवारांअभावी भरली न गेल्यास ती कशा प्रकारे भरण्यात यावीत याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या मुद्द्यांचा सर्वंकष विचार करुन शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

शासन निर्णय :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९१/२५५१/[क]/१६-ब, दिनांक २७ मार्च, १९९१ मधील आदेश अधिक्रमीत करुन खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

सरळ सेवा भरती

अ] अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, विमुक्त जाती [अ] भटक्या जमाती भटक्या जमाती [क] भटक्या जमाती [ड] व इतर मागासवर्गीय इ]

..२..